**ज्योतिषविषयक**

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



DIRECT ADMISSION

MBBS | MD | MS | BDS | MDS

BAMS | BUMS | BHMS

PANCHAKARMA

DERMATOLOGY | NURSING

PHARMACY

PHYSIOTHERAPY

PARAMEDICAL | VETERINARY

OPHTHALMOLOGY | FMGE

Indo Abroad Education

9326134770



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १५६ वा | मंगळवार, दि. २० जानेवारी २०२६ | पाने: ८ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# महापौर पदासाठी आरक्षण सोडत 22 जानेवारीला

## सोलापूरात महापौरपदी कुणाची लागणार वर्णी ?

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यामध्ये महापालिकेची निवडणूक पार पडली असून 29 पालिकांच्या निवडणूका झाल्या आहेत.

तब्बल 25 महापालिकांमध्ये महायुतीचा महापौर बसणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. मुंबई, पुणे महापालिकेसह महत्त्वांच्या पालिकांमध्ये कोण धुरा सांभाळणार याकडे लक्ष लागले आहे. महापौर पदाबाबत आता नगरविकास विभागाने अधिकृत पत्र काढून तारीख जाहीर केली आहे. यामुळे राजकीय हालचालींना वेगआला आहे.

राज्याच्या नगरविकास खात्याकडून महापौर पदाची सोडत जाहीर केली जाते. मात्र सध्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्रामध्ये नाहीत. मुख्यमंत्री फडणवीस हे दावोस दौऱ्यावर गेले आहेत. त्यामुळे महापौर आरक्षण सोडतीला उशीर होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास खात्याचा कारभार आहे. एकनाथ शिंदेंनी




हिरवा कंदील दिल्यानंतर महापौर आरक्षण सोडतीची तारीख जाहीर करण्यात आली आहे.

सध्या नगरविकास खात्याचे एक पत्र समोर आले आहे. शासनाचे उपसचिव अनिरुद्ध जेवळीकर यांनी 19 जानेवारी रोजी नगर विकास खात्याच्या राज्यमंत्र्यांच्या खाजगी सचिवांना हे पत्र लिहिले आहे. या पत्रानुसार, येत्या 22 जानेवारी रोजी महापौर पदाच्या आरक्षणासाठी सोडत जाहीर केली जाणार आहे. राज्यातील २९ महानगरपालिकांमधील महापौर पदाचे आरक्षण निश्चितीसाठी आरक्षणाची सोडत मा. राज्यमंत्री (नगर विकास) महोदयांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, दि.२२.०१.२०२६ रोजी, परिषद सभागृह, ६ वा मजला, मंत्रालय, मुंबई येथे सकाळी ११.०० वा. पासून आयोजित करण्यात आली आहे. तरी, सदर बाब राज्यमंत्री (नगर विकास) महोदयांच्या निदर्शनास आणण्यात यावी, ही विनंती, असे पत्रामध्ये नमूद करण्यात आले आहे.

राजकीय पक्षाकडून जोरदार तयारी केली जात आहे. अनेक पालिकांमध्ये महापौर बसवण्यासाठी एका पक्षाने बहुमत नाही. त्यामुळे राजकीय पक्षांचे अंकाचे गणित जुळवण्याचे प्रयत्न सुरु आहेत. यासाठी नगरसेवक फोडण्याचे राजकारण सुरु झाले आहे. मुंबई महापालिकेबाबत देखील हीच परिस्थिती आहे महायुतीचा मुंबईमध्ये महापौर बसणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र एकनाथ शिंदे यांनी अडीच वर्षे मंत्रिपद मिळवण्यासाठी आग्रही असल्याचे बोलले जात आहे. भाजपचा नेता महापौर बसवण्यासाठी जोरदार प्रयत्न केले जात आहेत. यावरुन काय निर्णय घेतला जाणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत भाजपला ऐतिहासिक विजय मिळाल्यानंतर महापौरपदी आता कुणाची लागणार याकडे लक्ष लागले आहे. निवडून आलेले आयाराम नगरसेवक की मूळ भाजपचे निवडून आलेल्या जुन्या कार्यकर्त्यांतून आलेल्या नगरसेवकांची वर्णी लागणार याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष आहे.

भाजपने यंदा महापलिका निवडणुकीत शत प्रतिशतचा नारा देत 102 पैकी 87 जागांवर विजय संपादन केले. त्यामुळे भाजपमधून इच्छुकांची संख्या वाढली आहे. शहर उत्तर, दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघात काँग्रेस, राष्ट्रवादीतील अनेक नेत्यांचा भाजपमध्ये प्रवेश घडवून तिकीट देण्यात आले. यातील बहुतांश आयाराम नगरसेवक झाले. तिकीट वाटपात निष्ठावंतांवर अन्याय झाल्याची भावना निर्माण झाली. नाराजीही व्यक्त करत आंदोलने केली. परंतु पक्षाने त्याकडे दुर्लक्ष करत आयारामांना प्रवेश देत नगरसेवक केले. आता आयाराम नगरसेवकांची संख्या अधिक झाल्याने महापौर निवडीतही आयाराम नगरसेवकांची वर्णी लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

महापौरपदासाठी अद्यापही आरक्षण सोडत निघालेले नाही. डॉ. किरण देशमुख, शिवानंद पाटील, राजश्री कणके, संजय कोळी, विनायक विटकर, नरेंद्र काळे, अमर पुदाले हे भाजपाचे जुने नगरसेवक आहेत. रंजिता चाकोते, विनायक कोंड्याल, श्रीदेवी फुलारे यांचीही नावे चर्चेत आहेत. त्यामुळे महापौरपदी वर्णी कुणाची लागणार हे आरक्षण निश्चित झाल्यानंतरच होणार आहे.

## सोलापूर महापालिकेत भाजपचे 9 व 'एमआयएम'चा 1 नगरसेवक वाढणार!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापालिका निवडणुकीत भाजपला ८७ जागांवर विजय मिळाला. आता १० सदस्यांमागे एक स्वीकृत नगरसेवक घेता येणार आहे. त्यानुसार भाजपला नऊ आणि आठ नगरसेवक निवडून आलेल्या 'एमआयएम'ला एक स्वीकृत नगरसेवक घेता येणार आहे.

महापालिका आयुक्तांनी नगरसचिवांकडून मागितलेल्या मार्गदर्शनात तसे नमूद आहे.

स्वबळावर महापालिका लढलेल्या भाजपला मुस्लिमबहूल प्रभाग १४ आणि २० मध्ये यश मिळाले नाही. त्याठिकाणी 'एमआयएम'चे उमेदवार विजयी झाले. २६ पैकी २१ प्रभागात भाजप उमेदवारांना पॅनल टू पॅनल मते मिळाल्याने तेथील सगळेच उमेदवार विजयी झाले. आमदार देवेंद्र कोठे यांनी स्वतःच्या जागेवर माजी उपमहापौर पद्माकर काळे यांना उमेदवारी दिली होती, पण त्यांचा पराभव झाला. त्यांना किंवा श्रीकांत घाडगे यांना 'स्वीकृत'ची संधी मिळू शकते. तसेच भाजप शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी निवडणुकीत मोठी मेहनत घेतली. ज्येष्ठ माजी नगरसेवक प्रभाकर जामगुंडी, जगदीश पाटील यांचेही योगदान आहे. याशिवाय अन्य काही उमेदवार, नवीन चेहऱ्यांनीही पक्षाला मोठी मदत केली. त्यांना किंवा त्यांच्या कुटुंबात 'स्वीकृत'ची लॉटरी लागू शकते.

दुसरीकडे फिरदोस पटेल यांनी काँग्रेसची उमेदवारी डावलून पराभवाची चिंता न करता 'एमआयएम'मध्ये प्रवेश करून निवडणूक लढविली. त्यांनाही 'एमआयएम'कडून स्वीकृतची संधी मिळू शकते. गाझी जहागीरदार देखील स्वीकृतीचे प्रबळ दावेदार मानले जातात. 'स्विकृत'साठी इच्छुकांचे स्थानिक आमदारांच्या घरी, संपर्क कार्यालयात हेलपाटे वाढले आहेत.










## संपादकीय

# कार्यकर्त्यांचीच निवडणूक

राज्यातील 29 महानगरपालिकांची निवडणूक नुकतीच पार पडली आणि या निवडणुकीमध्ये मतदारांनी दिलेल्या कौलाचे विश्लेषणही सुरू झाले आहे. या निवडणुकीच्या प्रचाराच्या दरम्यान बहुतेक सर्व प्रमुख राजकीय पक्षांचे नेते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या निवडणुका असतात असे म्हणत होते आणि या निवडणुकीतील निकालावर जर नजर टाकली एक गोष्ट निश्चितपणे स्पष्ट होते, ते म्हणजे ज्या पक्षाला ज्या ठिकाणी कार्यकर्त्यांचे मोठ्या प्रमाणावर पाठबळ होते त्या पक्षाला त्या ठिकाणी चांगले यश मिळालेले दिसते.

राज्यात प्रामुख्याने सत्ताधारी भारतीय जनता पक्षाला बहुतांशी महानगरपालिकांमध्ये चांगले यश मिळाले असले, तरी काही ठिकाणी त्यांना पराभवही पत्करावा लागला आहे. ज्या ठिकाणी भारतीय जनता पक्षावर विरोधी पक्षांनी मात केली आहे, त्या ठिकाणची परिस्थिती बघितली तर विरोधी पक्षांच्या कार्यकर्त्यांनी मनापासून काम केल्यामुळे भारतीय जनता पक्षाला पराभूत करण्यात त्यांना त्या ठिकाणी यश आलेले दिसते.

लातूर महानगरपालिकेमध्ये अमित देशमुख यांच्या नेतृत्वाखालील ज्या प्रकारे काँग्रेसने एकतर्फी यश मिळवून महापालिकेवर सत्ता मिळवली ते यश निश्चितच कार्यकर्त्यांचे यश होते. भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या विधानामुळे भारतीय जनता पक्ष इथे नकारात्मक परिस्थितीत गेला. त्याचाही फटका जरी भारतीय जनता पक्षाला बसला असला तरी लातूरमधील काँग्रेस कार्यकर्त्यांचा पाया भक्कम असल्यामुळेच तेथे चांगले यश मिळाले. अशीच परिस्थिती कोल्हापुरातही पाहायला मिळाली. कोल्हापूरमध्ये सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचा पाया भक्कम असल्यामुळे त्या ठिकाणी काँग्रेस सर्वात मोठा पक्ष ठरला. जरी महायुतीला संपूर्णपणे हरवण्यात काँग्रेस पक्ष अयशस्वी ठरला तरी एक प्रबळ विरोधी पक्ष म्हणून कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये काँग्रेस समोर येताना दिसत आहे.

परभणीमध्येसुद्धा उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने सत्ता ताब्यात घेतली. तेथेसुद्धा उद्धव ठाकरे यांच्या शिवसैनिकांचा पाया भक्कम असल्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला तेथे शिरकाव करता आला नाही आणि भारतीय जनता पक्षालासुद्धा यश मिळवता आले नाही. चंद्रपूर, अमरावती, भिवंडी यासारख्या महानगरपालिकांमध्ये सुद्धा काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मनापासून काम केल्यामुळे त्या ठिकाणी काँग्रेसला चांगले यश मिळाले. केवळ मुंबईचा विचार करता भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना महायुतीला सत्ता मिळाली असली, तरी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांचे यशही कार्यकर्त्यांच्या बळावरच मिळालेले दिसते.

उद्धव ठाकरे यांना सोडून एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेलेल्या अनेक नगरसेवकांना या निवडणुकीमध्ये पराभव पत्करावा लागला आणि या निमित्ताने अनेक नवीन कार्यकर्ते नगरसेवकाच्या स्वरूपात उद्धव ठाकरे यांच्या सेनेमध्ये दाखल झाले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेलासुद्धा कार्यकर्त्यांच्या पाठबळावर निवडणुकीत बऱ्यापैकी यश मिळालेले दिसले. म्हणजेच विरोधी पक्षांना ज्या ठिकाणी त्यांच्या कार्यकर्त्यांचे पाठबळ चांगले मिळाले त्या ठिकाणी यश मिळाले, तसे सत्ताधारी पक्षालासुद्धा हा अनुभव आलेला दिसतो. पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूर, नाशिक, सोलापूर या ठिकाणी भारतीय जनता पक्षाने मिळवलेले यश केवळ कार्यकर्त्यांच्या पाठबळावरच आहे.

तर ठाणे आणि नवी मुंबई मध्ये शिवसेनेने मिळवलेले यशसुद्धा तेथील स्थानिक कार्यकर्त्यांच्या पाठबळावरच आहे. ही सर्व परिस्थिती बघता महानगरपालिकांच्या निवडणुकांचे विश्लेषण करताना कार्यकर्त्यांचे पाठबळ हा महत्त्वाचा निकष ठरला आहे हे विसरून चालणार नाही. कॉर्पोरेट राजकारण करून चालत नाही तर कार्यकर्त्यांना बळ द्यावे लागते याचा धडा निश्चित सर्वच राजकीय पक्षांना या निमित्ताने मिळाला आहे. भारतीय जनता पक्षाने इतर प्रमुख विरोधी पक्षांमधील नेत्यांना आपल्या पक्षामध्ये सामावून घेताना त्या नेत्याचे कार्यकर्तेसुद्धा त्या नेत्यासोबत आपल्याकडे येतील याची खात्री असल्यामुळेच त्यांना त्याचा या निवडणुकीमध्ये काही प्रमाणात फायदा झालेला दिसला. ज्या पक्षांमध्ये केवळ नेतेच राहिले आहेत आणि कार्यकर्त्यांचे पाठबळ नाही अशा काही पक्षांना या निवडणुकीमध्ये मतदारांनी नाकारले हे स्पष्टपणे दिसून आले.

एमआयएम असो किंवा इस्लाम पक्ष असो या दोन पक्षांनासुद्धा मुस्लीम कार्यकर्त्यांचा पाठिंबा लाभल्यामुळेच त्यांना अनेक ठिकाणी चांगले यश मिळाले. साहजिकच आता महिनाभराच्या कालावधीतच होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये पुन्हा एकदा सर्वच राजकीय पक्षांना या कार्यकर्त्यांचे पाठबळ अजमावे लागणार आहे. आत्तापासूनच या निवडणुकीसाठी विविध प्रकारची उलटसुलट समीकरणे आकारास येत असतानाच ज्या पक्षाला कार्यकर्त्यांचे खरे पाठबळ लाभेल तोच पक्ष जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये लक्षणीय कामगिरी करेल हे उघड आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या खरोखरच कार्यकर्त्यांच्या हातात असतात आणि कार्यकर्त्यांच्या पाठबळाच्या आधारेच राजकीय नेते सत्तेवर बसू शकतात हे पुन्हा एकदा महापालिका निवडणुकीने सिद्ध केले आहे आणि जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये ते पुन्हा एकदा नव्याने सिद्ध होण्याचे संकेत मिळत आहेत.

# महाराणा प्रतापसिंह यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने महाराणा प्रतापसिंह यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्त सात रस्ता येथील डॉ. कोटणीस उद्यानातील महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळ्यास व कौन्सिल हॉल येथील आयुक्त कार्यालयात महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे,प्रतापसिंग चव्हाण, उज्वल दीक्षित, दर्शन दुबे, गौरव पवार,अमित पवार, जितेंद्र इटाई, विकास ठाकूर, प्रणव ठाकूर उपस्थित होते.

## वात्रटिका

### तडजोड कोंडी

कार्यकर्ते म्हणाले,हं
आता कस्स बरं पटलं...
संधी साधून बरोबर
आता खिंडीत गाठलं...
चेकाळून गेले होते ते
विजयी आकडा बघून...
ऐनवेळी गोची केली की
तडजोडीसाठी अटी ठेऊन...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

# बदलत्या खेडेगावांची कहाणी

गाव बदलत आहेत! नव्हे गावं आता पार बदलूनच गेली आहेत! २५-३० वर्षांपूर्वीची गावं अगदी वेगळीच होती. आता गावात एखादा पंचवीस तीस वर्षांपूर्वी आलेला व्यक्ती अचानक आला तर त्याला एखाद्या नवीन ठिकाणी आल्याचा भास झाल्याशिवाय राहणार नाही. पूर्वी गावात शिरण्यापूर्वीच हागणदारीचा वास येत असे. थोडक्यात येणारा हा वासच गाव जवळ आल्याची दवंडी देत असे. गावात सर्वत्र अस्वच्छता होती. त्यामुळे विशेषतः पावसाळ्यात रोगराईचे साम्राज्य पसरत असे. आषाढात उलटी-जुलाबाची साथ हमखास येत असे. डोळे येणे, खरूज होणे अशा साथीच्या आजारांनी गरीब आणि मागासलेल्या समाजातील लोक फार त्रस्त असत.

गावात दळणवळणाची मोठी अडचण होती. 'मुक्काम एसटी' सकाळी लोकांना तालुक्याला किंवा जवळच्या मोठ्या गावाला घेऊन जायची; सकाळ, दुपार आणि संध्याकाळ अश्या फक्त तीनच एसटीच्या फेऱ्या होत असत. पुढे वडाप-जीप वाढू लागल्या. कमांडर कंपनीच्या जीपा त्या काळात सर्वाधिक दिसत. लोक मुंग्यांसारखे भरून या कमांडर गाड्या खड्डे चुकवत रस्त्यावरून धावत असत. ड्रायव्हर तिरके बसून ही जिपडी वाऱ्याच्या वेगाने चालवत. घराघरांवर दूरदर्शनसाठी उंच अँटिने उभे केलेले दिसत. घरात ब्लॅक अँड व्हाईट टीव्ही होते; श्रीमंत आणि सावकार लोकांनी घरात रंगीत टीव्ही नवलाई म्हणून घेतले होते. गावाची सकाळ मंदिरांच्या शिखरावर लावलेल्या करण्यांमधून ऐकू येणाऱ्या भोपाळीने व्हायची, तर रात्र कीर्तन-भजन ऐकत संपायची. जत्रा-यात्रा लोकांच्या थोड्याशा मौजमजेसाठी असत. कुस्त्यांच्या फडावर मर्दानगी सिद्ध होत असे; तर तमाशाच्या फडात कित्येक मर्द मोहित होत असत. झेडपी शाळांमधून मुलं प्राथमिक शिक्षण घेत; पंचक्रोशीत एखादं हायस्कूल असायचं आणि तिथे मुलांना दर्जेदार शिक्षण मिळत असे. अनेक विद्यार्थी या मराठी शाळांतून शिकून मोठ्या पदांवर पोहोचले आणि निवृत्तही झाले. गावात स्पष्ट वर्णव्यवस्था आणि बलुतेदारी होती. जाती-पातीच्या विषारी वेलीत समाज जोखडला होता. पण तरीही शेतीवर आधारित अर्थव्यवस्था सर्वांना जगवत होती.

आता गावं पूर्णपणे बदलली आहेत. शहरातील सुखसुविधा खेड्यांपर्यंत पोहोचल्या आहेत. टीव्हीवर असंख्य चॅनेल उपलब्ध आहेत. आर्थिक सुबत्तेमुळे गावातही शहरातील घराप्रमाणे सुंदर बंगले उभे राहिले आहेत. या बंगल्यांसमोर लाखो रुपयांच्या कार दिसतात.

गावं -शहरं चांगल्या रस्त्यांनी जोडल्याने खेड्यातले अनेक लोक रोज शहरात कामाला जाऊन संध्याकाळी गावात परत येतात. पंचक्रोशीत इंग्लिश-मिडियम शाळा वाढल्या आहेत. स्कूलबसभरुन मुलं शेजार पाजारच्या गावातून गोळा केली जातात. आता गावातही इंग्रजीतून शिक्षण घेण्याचं वार सोसाट्याने वाहत आहे.

पूर्वी गावामध्ये ठिगळं लावलेल्या पँटी घालून पोर ठिगळं लपवत लपवत शाळेला जायची. आता पोरांकडे फॅशनेबल कपडे आहेत. गावातील सायकलीच्या जागा आता दुचाकींनी घेतल्या आहेत. आता गावातील पुढारपण करणारे लोक दररोज शहराकडे जातात आणि संध्याकाळी गावात येतात. घरोघरी कारभारी झाले आहेत. शहरात भट्टीचे कपडे घालून स्वतःला मिरवून आणणं गावातील या तथाकथित पुढाऱ्यांसाठी भूषणावह झालं आहे. पुढारपण करण्याची हौस गावात वाढत आहे. एकमेका विरुद्ध काड्या करणे, चाड्या चुगल्या करणं, अपप्रचार करणं यातून गावातल्या राजकारणाला ऊत आला आहे. प्रत्येक तरुणाच्या हातात आता मोबाईल आला आहे. रील आणि व्हिडिओ यानं तरुणांची डोकी फिरवली जात आहेत. रात्र रात्रभर मोफत डाटा झोपू देत नाही . मोबाईलवर काय बघावं आणि काय नको याचं तारतम्य राहिलं नाही. माहिती ज्ञान मिळवण्यापेक्षा इचकट विचकट व्हिडिओ बघून पोरं पोरी बिघडली आहेत. स्वस्तात प्रसिद्धी मिळवण्यासाठी अनेक जण रिलच्या नादी लागले आहेत. खेड्यातील अर्थव्यवस्था आता पार बदलून गेली आहे. नोकरीसाठी अनेकांनी गाव सोडलं आहे. कोणतंही शिक्षण आणि कौशल्य नसणाऱ्यांना शहरात झोपडपट्ट्यात राहवं लागत आहे. तर ज्यांनी उच्च कौशल्यपूर्ण शिक्षण घेतलं आहे त्यांना शहरात मानसन्मानानं जगता येऊ लागलं आहे.

गाव बदलली, काळ बदलला, आणि माणसांच्या जगण्याची पद्धतही बदलली. परंतु या बदलाच्या प्रवाहात संस्कृती, माणुसकी, नातेसंबंध आणि मूल्यांची जपणूक केली गेली पाहिजे.



**- किशोर जाधव,** सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

# मेव्हण्याचा खून केल्याप्रकरणी कोल्हापूर उच्च न्यायालयातून जामीन मंजूर - ॲड. रितेश थोबडे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नागेश संतोष विटकर वय -20, रा- सोलापूर याचा खून केल्याप्रकरणी अभिषेक अंबादास बंदपट्टे वय - 23, रा- सोलापूर यास कोल्हापूर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नितीन बी सूर्यवंशी यांनी जामीन मंजूर केला.

यात हकीकत अशी की, मयत नागेश हा आरोपी अभिषेक चा मेव्हणा होता. मयत नागेश याने अभिषेक याची सासू अनिता हिस अभिषेक यास दारूचे व्यसन आहे, जुगार व मटका खेळतो, बाईचे लफडे करतो असे खोटे सांगितले होते. त्यामुळे अभिषेक व त्याच्या पत्नीमध्ये भांडण झाले होते. दिनांक 12/3/2025 रोजी आठ वाजेच्या सुमारास तो घरी असताना त्याला कोणाचा तरी फोन आला म्हणून तो बाहेर गेला होता. साधारण साडेआठ वाजेच्या सुमारास फियार्दी हिची जाऊ



प्रियंका विटकर हिने सांगितले की, तिच्या घरासमोर नागेश यास अभिषेक बंदपट्टे व अविनाश बंदपट्टे हे लाकडी दांडक्याने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करीत आहेत, त्यावेळी फिर्यादी लिंबूबाई ही तेथे गेली असता, मयत नागेश हा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला होता व आरोपी अभिषेक व अविनाश हे तिस पाहून गाडीवर बसून पळून गेले. त्यानंतर नागेश यास उपचारार्थ सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले असता, तो मयत झाला. अशा आशयाची फिर्याद मयताची आई लिंबूबाई संतोष विटकर हिने जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दिली होती. त्यावर आरोपीस अटक झाली होती.

आपणास जामीन मिळवा म्हणून आरोपी अभिषेक याने जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर येथे अर्ज दाखल केला होता, तो अर्ज न्यायालयाने फेटाळला होता. त्यावर आरोपी अभिषेक याने एडवोकेट रितेश थोबडे यांच्यामार्फत जामीन मिळणेसाठी कोल्हापूर उच्च न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता.

अर्जाच्या सुनावणीच्या वेळी ॲड. रितेश थोबडे यांनी आपले युक्तिवादात सक्रतर्शनी खुनाचा गुन्हा दिसून येत नाही, असा युक्तिवाद मांडला, त्यावरून न्यायमूर्तींनी 15,000 /- रुपयांच्या जातमुचलक्यावर अर्जदार/ आरोपीस जामीन मंजूर केला.

## 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमासाठी नांदेड सज्ज !

# १० लाख भाविकांची मांदियाळी - विभागीय आयुक्त पापळकर

**लातूर, (कटूसत्य वृत्त):-** नांदेड नगरी एका ऐतिहासिक सोहळ्यासाठी सज्ज होत आहे. शीख धमार्चे नववे गुरु श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांचा ३५० वा 'शहीदी समागम' हा भव्य कार्यक्रम येत्या २४ आणि २५ तारखेला पार पडणार आहे. त्यासाठी प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. देश-विदेशातून सुमारे १० लाख भाविक या सोहळ्यासाठी नांदेडमध्ये दाखल होण्याची शक्यता असल्याचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी सांगितले.

### सूक्ष्म नियोजन आणि विविध समित्या

कार्यक्रमाच्या दृष्टीने प्रशासनाने सूक्ष्म नियोजन केले आहे. भाविकांच्या सोयीसाठी विविध समित्या स्थापन केल्या आहेत. यात बुटांच्या व्यवस्थेपासून ते भोजनापर्यंतच्या जबाबदाऱ्या वाटून देण्यात आल्या आहेत. भाविकांसाठी ८ ठिकाणी अखंड 'लंगर' (महाप्रसाद) सुरू राहतील.



तसेच, त्यांच्या निवासाचीही उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. कार्यक्रम ठिकाणी आरोग्य शिबिरे उभारण्यात आली आहेत. यासोबतच शासकीय योजनांचे आणि विविध उद्योजकांचे स्टॉल्सही उपलब्ध असतील.

या सोहळ्याला अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर राज्यांचे मुख्यमंत्रीही नांदेडमध्ये येतील. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीनेही कडेकोट तयारी करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाचा अल्पसंख्याक विभाग या कार्यक्रमासाठी 'नोडल एजन्सी' म्हणून काम पाहत आहे.

हा कार्यक्रम एका समाजापुरता मर्यादित नाही. यात लबाना, बंजारा,सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल आदींसह आणि इतर सर्व समुदायांचे लोक मोठ्याप्रमाणात सहभागी होत आहेत.

### जनतेचे योगदान महत्त्वाचे

आजच्या धावपळीच्या जगात 'त्याग आणि सेवा' हीच खरी माणुसकी आहे. हा विचार जपण्याची ही सुवर्णसंधी आहे. त्यामुळे मराठवाडा आणि महाराष्ट्रातील जनतेसह देशभरातील जनतेने या ऐतिहासिक सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले आहे. ज्यांना या महायज्ञात सेवा (स्वयंसेवक म्हणून) द्यायची आहे, त्यांनी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी नमूद केले.

# सबकुछ जिहाद! अक्कल बरबाद!!

**'लव जिहाद'ने महाराष्ट्रातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रचार काळात व्यापक रूप धारण केले. 'जिहाद'च्या पुढे वोट, लँड, दूध, हॉकर्स, जंगल, सागर आदि शब्द लागले. त्याची झाडाझडती**



**ज्ञानेश महाराव**
ज्येष्ठ पत्रकार- संपादक




हिंदू- मुस्लीम तेढ वाढती राहावी यासाठी वापरल्या जाणाऱ्या "लव जिहाद"प्रमाणेच, आता वोट जिहाद, दूध जिहाद, लँड जिहाद, सागरी जिहाद, हॉकर्स जिहाद, पॉप्युलेशन जिहाद, जंगल जिहाद ह्या विशेषणांचा वापर होऊ लागलाय. ह्यातील "लव जिहाद" आणि "पॉप्युलेशन जिहाद" ही विशेषणं माणसांशी संबंधित आहेत. बाकीची मुस्लिमांच्या कायदेशीर - बेकायदेशीर व्यवसायांशी संबंधित आहेत. खरंच, मुस्लिमांचा "जिहाद" इतका व्यापक आहे का?

इस्लामींचा 'जिहाद' हे हिंदूंसाठी 'धर्मयुद्ध' आणि ख्रिश्चनांसाठी 'क्रूसेड' होतं. मात्र, ह्या तीनही शब्दांचे अर्थ भिन्न आहेत. परंतु, धर्मवाद त्यांना 'एकाच माळेचे मणी' करतो. "सुईच्या टोकाइतकीही भूमी देणार नाही!" ह्या दुर्योधन-दुःशासनाच्या फूत्कारामुळे भगवान श्रीकृष्णाच्या साक्षीने झालेलं कौरव- पांडव यांचं युद्ध; हे हिंदूसाठी 'धर्मयुद्ध' झालं आहे. ते कुठल्या धर्म-संप्रदायाच्या विरोधात नव्हतं. ते सत्य आणि न्यायासाठी लढलं गेलं. अर्थात, ती लढाई पुस्तकी आहे. ते राम- रावणाच्या युद्धासारखेच काल्पनिक आहे. तो मानवी जीवनाचा इतिहास नाही. याउलट, 'क्रुसेड' हे ख्रिस्त्यांची ओळख असलेल्या 'क्रूस'च्या- ख्रिश्चन धर्माच्या रक्षणासाठी लढलेले युद्ध आहे. ते जेरुसलेम येथील येशू ख्रिस्ताच्या पवित्र स्मृतिभूमीवर ताबा मिळवण्यासाठी इ.स. १०९५ ते १२९१ ह्या काळात सात वेळा झालं. ते इस्लामींच्या विरोधात झालं. या भूमीवर पूर्ण हक्क प्रस्थापित करण्यासाठी ख्रिस्ती, यहुदी आणि मुसलमान यांच्यात आजही युद्ध सुरू आहे. ह्या युद्धाला मुसलमान 'जिहाद' म्हणतात.

"जिहाद" वा "जेहाद" हा अरबी शब्द आहे. त्याचा अर्थ 'संघर्ष' असा होतो. 'जिहादॅचे दोन प्रकार आहेत. पहिला 'जिहाद अल-अकबर' म्हणजे 'बड़ा जिहाद'! तो संघर्ष स्वतःमधील गैर-वाईट गोष्टी नष्ट करण्यासाठी करायचा असतो. दुसरा, 'जिहाद अल असगर' म्हणजे 'छोटा जिहाद'! तो संघर्ष समाजातल्या अनिष्ट, अन्यायकारक गोष्टींविरोधात करायचा असतो. ह्या दोन्ही 'जिहादचा उल्लेख 'कुराणॅ मध्ये आहे. कारण तो प्रेषित मोहम्मद यांनी आपल्या हयातीत इस्लामींकडून अपेक्षिला होता. तथापि, ११ व्या शतकात जेरूसलेमच्या भूमीवरून वाद सुरू होऊन क्रूसेडर्सनी आक्रमणाची मोरचेबांधणी केली. तेव्हा 'जिहाद'ची बांग देत, मुस्लिमांना संघटित करण्यात आले. मुस्लिमांनी एकजुटीने ख्रिस्ती-क्रूसेडर्सचा पराभव करून त्यांना सिरियातून हटवलं आणि तिथे 'इस्लामिक गणराज्यॅ स्थापन केलं. म्हणजे, काल्पनिक धर्मयुद्ध असो वा 'क्रूसेड - जिहाद' असो; त्याचा संबंध भूमीच्या ताब्याशी आहे; तिथल्या सत्तेशी आहे; धर्मरक्षण वा धर्मविस्ताराशी नाही. त्यासाठी ख्रिस्ती क्रूसेडर्स आणि मुस्लीम जिहादी यांच्यात धर्मयुद्ध झाले; होत राहिले. याउलट हिंदूंची 'सब भूमी गोपाल की', 'विश्वचि माझे घर' अशी विश्वव्यापी विचारधारा असल्याने हिंदभूमीवर पाच इस्लामी शाह्यांनी ६५० वर्षे राज्य केलं आणि १५० वर्षे ब्रिटिशांनी अखंड भारत आपल्या राजवटीखाली ठेवला! तरीही धर्मयुद्ध झालं नाही. (तो अनुशेष हिंदूंमधील जातिभेदांच्या संघषार्ने भरून निघत असावा.)

आपला भारत देश ७८ वर्षांपूर्वी भारत परकीय चक्रातून मुक्त होऊन सार्वभौम राष्ट्र झाला. तो होताना हिंदुस्तान- पाकिस्तान अशी नाही, तर भारत- पाकिस्तान अशी फाळणी झाली. पाकिस्तान "इस्लामी धर्मराष्ट्र" झाला आणि भारत सर्वधर्मांना सामावून घेणारे 'राष्ट्र' झाला. सर्वांगीण विकासाच्या दिशेने वाटचाल करू लागला. 'प्रगतिशील राष्ट्र' अशी भारताची ओळख निर्माण झाली व ती उत्तरोत्तर वाढत राहिलीय. याउलट स्थिती, 'धर्मराष्ट्र' बनलेल्या पाकिस्तानची झालीय. धर्मराष्ट्राची सडकी आवृती इतकी खेटून असताना सत्तेसाठी देशात धार्मिक-जातीय तेढ-द्वेष वाढर्णाया भाषेला-खेळ्यांना मोकळीक देणं; हिंदूराष्ट्राच्या फुसकुल्या सोडणं; हा 'राष्ट्रद्रोह' आहे. तोच आज देशात 'राष्ट्रवाद' म्हणून मिरवतोय. त्यासाठी मुस्लीम तरुण आणि हिंदू तरुणीच्या प्रेम प्रकरणाला "लव जिहाद"चा टिळा लावला जातो.

अलीकडची, नोव्हेंबर २०२२ मधील मुंबई नजीकच्या वसईची घटना आहे. "लिव्ह इन रिलेशनशिप"मध्ये राहाणाऱ्या श्रद्धा वालकर हिची आफताब पूनावाला ह्याने निर्घृण हत्या केली. आफताबचे हे कृत्य अमानुष होते. त्याला त्याबद्दल कठोर शिक्षा होईल. ती झालीच पाहिजे. अमानुषता- क्रौर्य कमी होणार, संपणार का ? त्याची चर्चा कोण करणार? २०१० मध्ये डेहराडून येथील राजेश गुलाटी याने पत्नी- अनुपमाची हत्या केली आणि रेफ्रिजेटर खरेदी करून त्यात तिचा मृतदेह ठेवला. त्यानंतर मृतदेहाचे ७० तुकडे करून त्याची एकेक करीत विल्हेवाट लावली. तेच १२ वर्षांनी आफताब पूनावाला ह्याने केले. त्याने श्रद्धाच्या मृतदेहाचे ३५ तुकडे करून त्यातील रोज एकेक तुकड्याची विल्हेवाट लावली. बारा वर्षांत ७० चे १४० तुकडे न होता; ३५ झाले; म्हणजे क्रौर्य निम्म्यावर आले, असे समजायचे का ? तुकडे कमी केले, म्हणून त्याचा धर्म तपासायचा का ? आफताबच्या क्रौयार्ला "लव जिहाद" म्हणायचे! तर, राजेश गुलाटीच्या क्रौयार्ला काय म्हणायचे? प्रेम धर्मयुद्ध?

स्वजाती-धमार्साठी हवी तेवढी माती खायची आणि परजाती-धमार्चे प्रकरण निघाले की, लोकांची माथी कशी भडकतील ते पाहायचे! असे उद्योग गेले ३०-३५ वर्षे देशात जाणीवपूर्वक सुरू आहेत. त्यासाठी 'पद्मश्री' पुरस्कारप्राप्त डॉ. एस. एल. भैरप्पा ( जन्म : २० जुलै, १९३४; निधन : २४ सप्टेंबर, २०२५) यांच्यासारखे साहित्यिक हेदेखील धर्मवादी राजकारण्यांना, लोकांना धर्मांध करण्यास उपयुक्त ठरेल, अशी 'आवरण'सारखी कादंबरी लिहितात. २००७ मध्ये प्रकाशित झालेल्या ह्या कादंबरीच्या कन्नड बरोबरच मराठी, संस्कृत, हिंदी, गुजराती, इंग्रजी, मल्याळी अशा अनुवादित भाषेत चार वर्षांत ३४ आवृत्या प्रकाशित झाल्यात. हा 'कादंबरी' विश्वातील विक्रम समजला जातो. ह्या कादंबरीत असा काय पराक्रम आहे? तर कर्नाटकातील शेतकऱ्याची मुलगी "लक्ष्मी" शिकते आणि 'फिल्म इन्स्टिट्यूटॅमध्ये शिकण्यासाठी पुण्याला जाते. तिथे तिचं चित्रपटनिमार्ता आमीर कुरेशी याच्याशी प्रेम जुळतं. वडिलांच्या विरोधाला न जुमानता ती आमीरशी लग्न करते. 'लक्ष्मी'ची 'रझिया' होते. आमीर "कम्युनिस्ट" असतो. त्याच्या विचारधारेच्या विद्यापीठातून रझिया कुरेशी वक्ता, विचारवंत, स्तंभलेखिका म्हणून नाव कमावते.

आमीर-रझियाला 'हम्पी' या वारसास्थळाच्या अवशेषांवर माहितीपट बनवण्याचे काम मिळते. तिथे रझिया माहिती घेण्यासाठी गेली असता, हम्पीचा नाश वैष्णव- शिव संघषार्मुळे झाला, हे लेखन खोटे असल्याचे तिच्या लक्षात येते. विधवांनी कोरलेली नरसिंह देवाची भव्य मूर्ती पाहून तिच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. 'रझिया'त पुन्हा 'लक्ष्मी' प्रगटते. शेवटी 'सत्याच्या चष्म्यातून' इतिहासाकडे पाहाण्याचा निश्चय करून ती पटकथा लिहिण्याचे नाकारते. हे आमीरला अनपेक्षित असतं. त्यातून दोघांत वाद होतात; मनातून ते दुरावतात. कोणताही धर्म न मानणारा आमीर इस्लामच्या तरतुदीनुसार दुसरा 'निकाह' करतो. दरम्यान, वडिलांच्या मृत्यूची बातमी आल्याने 'लक्ष्मी' गावाला जाते. मुक्कामात ती वडिलांनी संग्रहित केलेली पुस्तकं - नोंदी तपासते. त्यात तिला बेगडी धर्मनिरपेक्षतेला- सर्वधर्मसमभावाला खतपाणी घालण्यासाठी पुरोगामी विचारवंतांनी रचलेल्या (तिच्या मते) खोट्या इतिहासाचे दर्शन घडतं.

या साहित्यातून लक्ष्मी कादंबरी लिहू लागते. त्यातील राजपूत युवराज मृत्यूच्या भीतीने धर्मांतर करून औरंगजेबच्या जनानखान्याचा मौलवी बनतो. पुढे तो काशी विश्वनाथ मंदिराच्या मशिदीत झालेल्या बदलाचा "पाक मुस्लीम" म्हणून साक्षीदार होतो. अशाप्रकारे भैरप्पा यांनी लक्ष्मीचा अभ्यास, चिंतन, जीवन आणि सार्वजनिक जीवन यांची सांगड घालून; तिला 'बनारस हिंदू विद्यापीठा'त प्राध्यापक असताना मुस्लीम बनलेल्या राजपूतच्या कथेशी जोडतात. वाचकांत, विशेषतः तरुण वाचकांत मुस्लीम द्वेष निर्माण होईल; पण तसा ठपका लागणार नाही, अशा सफाईने भैरप्पा यांनी "आवरण"ची मांडणी केलीय. त्यातून मुस्लीम राजांनी हिंदूंचे धर्मांतर करून, मंदिरे उद्ध्वस्त करून आपली जरब कशी निर्माण केली? तरीही, देव- देवळांच्या माध्यमातून हिंदू संस्कृती कशी टिकून राहिली, ते ठसवण्याचा यशस्वी प्रयत्न केलाय. त्यात तथ्य आहेच. ते नसते तर सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, देशातल्या यात्रा- जत्रा औरंगजेबनीच सुरू केल्या आहेत, असा इतिहास वाचायला मिळाला असता! संतोषी माता, वैभव लक्ष्मी ही भाकड व्रतंही बादशहाची चौथी-पाचवी बेगम एकत्रपणे करीत होत्या, अशा थापाही शिवशाहिरांनी मारल्या असत्या. तसे झाले नाही.

तथापि, कादंबरीसाठी तथ्य पुरेसं ठरत असलं, तरी त्यातून सत्य प्रकाशत नाही. इतिहास हा तथ्यावर नाही; तर सत्यावर आधारित असतो! जेव्हा सत्य नसते, तेव्हा थेट इतिहास लेखन करण्याऐवजी कथा- कविता, कादंबरी, नाटक, चित्रपट, टीव्ही मालिका अशा नटव्या- फसव्या माध्यमांचा आधार घ्यावा लागतो. ज्यांना हा फरक कळत नाही, ते नटव्या- फसव्या लेखनाला इतिहास समजतात. त्याने जसे ब.मो.पुरंदरेंचे फावले; तसेच डॉ. भैरप्पांचेही फावले. पण त्यातून जे साधायचे, ते साधले गेले. 'भाजप-संघ परिवार'चा निवडणुका जिंकण्याचा कार्यक्रम 'सेट' झाला. हेच महाराष्ट्रातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत "जिहाद"च्या पुढे वोट, लँड, दूध, हॉकर्स, जंगल, सागर आदि शब्द लावून झाले. ह्या धंद्यातील गैर-बेकायदेशीर व्यवहारांकडे गांभीयार्ने पाहिले पाहिजे. कारवाईसाठी सरकारकडे आग्रह धरला पाहिजे. पती- पत्नी संबंधातील हत्या या हिंदू, मुस्लीम, ख्रिस्ती, बौद्ध, जैन, शीख दांपत्यातही होतात. अशावेळी आपण त्यातलं क्रौर्य लक्षात घेऊन व्यक्त होतो. तसे आंतरजातीय- धर्मीय प्रकरणात होता येत नसेल; तर तो अधर्म आहे. ह्याचा विचार 'लव जिहाद'चं खूळ भेज्यात खेळवणाऱ्या भक्ताडांनी करणे आवश्यक आहे. तरच, "सबकुछ जिहाद" ह्या बेअक्कलपणाला मूठमाती मिळेल.

पुराणकथांत कुणाला तरी समुद्रात बुडवल्याची गोष्ट वारंवार येते. विष्णू पुराणात "समुद्र मंथन" आहे. तो सत्ययुगातला साक्षात्कार आहे. आजच्या कलियुगात 'सोशल मीडिया'च्या समुद्रात लोकांना बुडवण्याचे प्रकार रोजच्या रोज नव्यानं घडत असतात. त्यातून विष आणि अमृत दोन्हीही बाहेर पडत असते. दोन्हींतला फरक समजण्याएवढी तरी अक्कल प्रत्येकाकडे असलीच पाहिजे! अन्यथा, तो "डिजिटल जिहाद" ठरेल!!

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# प्रजासत्ताक दिन समारंभ नियोजन पुर्व बैठक संपन्न

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** भारतीय प्रजासत्ताक दिनाचा 76 व्या वर्धापन दिन सोमवार दि.26 जानेवारी 2026 रोजी साजरा करण्यात येणार असून, शासकीय ध्वजारोहण समारंभाचा कार्यक्रम रेल्वे मैदान, पंढरपूर येथे घेण्यात येणार आहे. यासाठी दरवर्षी प्रमाणे प्रत्येक विभागाला दिलेली जबाबदारी संबधित विभागांनी यशस्वीपणे पार पाडावी अशा सूचना, तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिल्या.



प्रजासत्ताक दिनाच्या पुर्व तयारीबाबत तहसील कार्यालय पंढरपूर येथे आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी बैठकीस मुख्याधिकारी महेश रोकडे, नायब तहसिलदार बालाजी पुदलवाड, संबधित विभागाचे अधिकारी तसेच पंढरपूर शहरातील विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते.

यावेळी तहसिलदार लंगुटे म्हणाले, प्रत्येक विभागाकडे कार्यक्रमासंबंधीची जबाबदारी दिलेली असते त्या अनुषंगाने ती यशस्वीपणे पार पाडावी. सार्वजनिक बांधकाम विभाग व नगरपालिका प्रशासनाने मैदान स्वच्छ करुन, दगड व खडी काढून, पाणी टाकून रोलींग करावे.तसेच शुध्द पिण्याच्या पाण्याची व अग्निशमन व्यवस्था करावी. आरोग्य विभागाने वैद्यकीय पथकासह सुसज्ज रुग्णवाहिका व प्रथमोपचार व्यवस्था उपलब्ध ठेवावी. उपस्थित मान्यवरांची बैठक व्यवस्था,विद्युत व्यवस्था आदीबाबतची व्यवस्था संबधित विभागाने करावी अशा सूचनाही तहसिलदार लंगुटे यांनी यावेळी दिल्या.

# अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त संविधान रॅली; सुमेद पोतदार रॅलीतील आकर्षण

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते एज्युकेशन सोसायटी नातेपुते संचलित प्राथमिक विभागाच्या वतीने संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त संविधान रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत इ.१ ली ते ४ थी पर्यंतच्या ४२५ विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग घेतला होता. मात्र या रॅलीमध्ये इ.१ लीतील विद्यार्थी सुमेद पोतदार याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पेहराव करून या रॅलीतील आकर्षण बनला होता. त्याने केलेल्या पेहरावामुळे अनेकांची मने जिंकली. अनेक विद्यार्थ्यांनी भारतातील वेगवेगळ्या प्रांतातील वेषभूषा परिधान केल्या होत्या. संविधानातील समतेची मुल्य जोपासने व भारतीय संस्कृतीचे दर्शन या पेहरावात दिसून आले. विद्यार्थी संविधानाची उद्देशिका व घोष वाक्य बॅनर हातात घेऊन घोषणा देत होते. रॅली शाळेच्या प्राथमिक विभागापासून सुरु होऊन शहरातील संविधान चौकात पोहचली त्या ठिकाणी नातेपुते एज्युकेशन सोसायटीचे सचिव अँड. शिवाजीराव पिसाळ संस्थेचे उपाध्यक्ष संतोष काळे यांनी संविधान स्मारकाचे पूजन करून पुष्पहार अर्पण केले त्यानंतर संविधान रॅली नातेपुते येथील बस स्थानकासमोर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळ पोहोचली यावेळी नातेपुते पोलीस ठाणेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजने, अँड. शिवाजीराव पिसाळ, संतोष काळे, एन.के. साळवे, सुनिल साळवे, जिवनदास सोरटे, श्रावण सोरटे, बंटी सोरटे, सागर बिचुकले, नवाज सोरटे, प्रकाश साळवे, दत्ता सोरटे, विशाल साळवे, इमाम मुलाणी, प्रा.राकेश सोरटे, प्रा. राजेंद्र खरे, छगन मिसाळ, शिवाजी सावंत, संजय साळवे, बाळासाहेब जाधव, मामा बनसोडे आदी उपस्थित होते. प्राथमिक विभागाचे सहशिक्षक अक्षय इंगोले यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. रॅलीसाठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक कुंडलिक इंगळे, अभिजीत वाळके, दादासाहेब देवकते, मारुती भांगरे, सहशिक्षिका कुंभार, बडवे आदिसह सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.



# प्रोलॉग स्पर्धेने दाखवून दिली भव्यतेची चुणूक

## ३५ देशांतील २८ संघांत विजेतेपदासाठी चुरस

**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेअंतर्गत आजच्या प्रोलॉग रेसने आयोजनातील भव्यता आणि जागतिक स्तरावरील दर्जा अधोरेखित केला. जगभरातील ३५ देशांतील २८ नामवंत संघांचे १६४ आंतरराष्ट्रीय सायकलपटू या स्पर्धेत सहभागी होत असून, सह्याद्रीच्या घाटरस्त्यांवरून सुमारे ४३७ किलोमीटरचा आव्हानात्मक प्रवास करत विजेतेपदासाठी प्रयत्न करणार आहेत.



स्पर्धेचा उत्साहवर्धक पूर्वरंग असलेली ७.५ किलोमीटरची प्रोलॉग (टाइम ट्रायल) रेसला दुपारी १.३० वाजता सुरूवात झाली. शहरातील नामदार गोपाळ कृष्ण गोखले चौक येथे पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी पहिल्या स्पर्धकाला हिरवा झेंडा दाखवत अधिकृत सुरुवात केली. यावेळी, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, राज्य क्रीडा व युवक कल्याण आयुक्त श्रीमती शीतल तेली- उगले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्यासह मान्यवर अधिकारी उपस्थित होते.

या प्रोलॉग रेसमध्ये स्पर्धकांनी वैयक्तिक स्वरूपात एकामागोमाग एक मिनिटाच्या अंतराने सुरुवात केली. ही मास स्टार्ट रेस नसून, प्रत्येक सायकलपटूची वैयक्तिक वेळ निर्णायक ठरणार आहे. पुणेकर नागरिकांनी शहरातील मध्यवर्ती रस्त्यांवरून जाणाऱ्या सायकलपटूंचे उत्साहात स्वागत केले.

स्पर्धेच्या पुढील टप्प्यांमध्ये आशिया खंडातील ७८, युरोपमधील ६९, तर ओशनिया, अमेरिका आणि आफ्रिका खंडांतील सायकलपटू सहभाग घेत आहेत. भारताचा इंडियन डेव्हलपमेंट संघही या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाला असून, देशांतर्गत सायकलिंगसाठी ही स्पर्धा मैलाचा दगड ठरणार आहे.

सुरक्षेच्यादृष्टीने स्पर्धा मार्गावर सुमारे १ हजार ५०० पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त होता. यामध्ये स्थानिक पोलीस, गुन्हे शाखा, विशेष शाखा, बॉम्ब नाशक पथक तसेच शीघ्र कृती दलाचा समावेश होता. वाहतूक व्यवस्थापनासाठी स्वतंत्र नियोजन करण्यात आले. आपत्कालीन वैद्यकीय सेवा, रुग्णवाहिका आणि तांत्रिक सहाय्य पथकेही सज्ज ठेवण्यात आली होती.

मंगळवार २० जानेवारी ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत पार पडणारी बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ ही स्पर्धा पुणे व परिसराच्या क्रीडा, पर्यटन आणि जागतिक ओळखीला नवे परिमाण देणारी ठरणार आहे. आजचा प्रोलॉग हा या भव्य आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेचा केवळ पूर्वरंग असून, पुढील दिवसांत सह्याद्रीच्या घाट रस्त्यावर रंगणारी चुरस अधिक उत्कंठावर्धक ठरणार आहे.

### ढोल-ताशांचा निनाद आणि शिवगर्जना

स्पर्धेच्या शुभारंभाच्या वेळी नामदार गोपाळकृष्ण गोखले परिसर ढोल-ताशांच्या गजराने दुमदुमून गेला होता. 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'च्या गगनभेदी घोषणांनी वातावरणात एक वेगळीच ऊर्जा संचारली. पारंपरिक मराठमोळ्या तालावर पुणेकरांनी आंतरराष्ट्रीय सायकलपटूंचे जल्लोषात स्वागत केले. भारतीय खेळाडूंचे नाव उच्चारताच टाळ्यांच्या कडकडाट करून त्यांनी खेळाडूंचा उत्साह वाढविला.

जागतिक खेळाडूंना पुणेकरांच्या आदरातिथ्यासोबत उत्साह आणि क्रीडाप्रेमाचा परिचय देत नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी केली होती. मोबाईलवर खेळाडूंचे छायाचित्र घेण्यासाठी युवकांनी गर्दी केली होती. खेळाडूंना चिअरअप करीत क्रीडाप्रेमींनी विविध देशांतील सायकलपटूंना प्रोत्साहन दिले. पुणेकरांचा हा प्रेमळ प्रतिसाद पाहून अनेक खेळाडूंनी हात हलवून अभिवादन स्वीकारले.

### स्पर्धेचा रंग वाढवणारा 'मस्कॉट'

बजाज पुणे ग्रँड टूरचे रंगीत बोधचिन्ह उपस्थितांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले. मस्कॉटसोबत सेल्फी घेण्यासाठी नागरिकांची झुंबड उडाली होती. क्रीडा स्पर्धेला उत्सवाचे स्वरूप देणारा हा क्षण सर्वांच्या चेहऱ्यावर हसू फुलवणारा ठरला. यानिमित्ताने महाराष्ट्राचा 'शेकरू' आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचला. निसर्ग आणि खेळ यांच्यातील नाते घट्ट करणारी ही स्पर्धा असून 'इंदू' त्याचेच प्रतिक आहे. सह्याद्रीच्या डोंगरदऱ्यातून वावरणारा शेकरू या वाटेने येणाऱ्या सायकलपटूंच्या स्वागतासाठी सज्ज असल्याचा संदेश यानिमित्ताने देण्यात आला.

### परंपरा आणि आधुनिकतेचा सुरेख संगम

मराठमोळा पोशाख, भगवे फेटे, ढोल-ताशे आणि त्याचवेळी आंतरराष्ट्रीय दर्जाची सायकल रेस—या सगळ्यांचा सुरेख संगम पुण्याच्या रस्त्यांवर पाहायला मिळाला. परंपरेचा सन्मान राखत आधुनिक क्रीडासंस्कृतीला चालना देणाऱ्या या स्पर्धेच्या निमित्ताने पर्यटनाला चालना मिळणार आहे. यानिमित्ताने पुणेकरांच्या आदरातिथ्याचा अनुभवही जगभरातील खेळाडूंना घेता येईल. त्याची सुरेख सुरूवात या मराठमोळ्या स्वागताने झाली.

### माध्यमांचा मोठा सहभाग

देश-विदेशातील माध्यम प्रतिनिधी, कॅमेरामन आणि छायाचित्रकारांनी प्रत्येक क्षण टिपण्यासाठी गर्दी केली होती. 'पुणे ग्रँड टूर'चा प्रत्येक सेकंद जागतिक पातळीवर पोहोचवण्याचा उत्साह माध्यमांमध्येही दिसून आला.

### पुणे—खेळांची जागतिक राजधानी होण्याची चाहूल

आजचा प्रोलॉग केवळ शर्यतीचा प्रारंभ नव्हता, तर पुणे शहर जागतिक क्रीडा नकाशावर अधिक ठळकपणे अधोरेखित करणारा उत्सव ठरला. सायकलिंगच्या क्षेत्रात सायकलचे शहर म्हणून एकाकाळी परिचीत असलेल्या पुण्याची ही ओळख नव्याने स्थापित होणार आहे. पुणेकरांनी मोठ्या संख्येने आजच्या स्पर्धेला उपस्थित रहात या सायकल आणि खेळाप्रती असणाऱ्या प्रेमाचे दर्शन घडविले.

### जिल्हा प्रशासनाच्या अथक प्रयत्नांचे फलित

मागील दोन महिन्यांपासून जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व प्रशासकीय यंत्रणा बजाज पुणे ग्रँड टूरच्या यशस्वी आयोजनासाठी अहोरात्र कार्यरत आहे. विविध विभागांमधील समन्वय, काटेकोर नियोजन आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे या आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे भव्य व सुस्थितीत आयोजन शक्य झाले. या परिश्रमांचे चीज होत असल्याची समाधानाची भावना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्यासह सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसून येत होती. देशातील पहिलीच स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रत्येकजण आपापली भूमिका उत्साहाने पार पाडत आहे.

# कर्जाचा गैरवापर; कारखान्यांवर कारवाई

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनामार्फत राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना दिलेल्या कर्जाच्या विनियोगात २१ साखर कारखान्यांनी उल्लंघन केले आहे. राष्ट्रीय सहकार विकास निगमनच्या (एनसीडीसी) अधिकाऱ्यांच्या पाहणीत ही बाब समोर आली आहे.

याचे उल्लंघन केलेल्या सहकारी साखर कारखान्यांबाबत कारवाईची शासनास शिफारस करण्यासाठी साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली आहे.

सहकारी साखर कारखान्यांना बळकटी देण्यासाठी अनुदान या योजनेतून राज्यातील ३२ सहकारी साखर कारखान्यांना खेळत्या भांडवलाची/मार्जिन मनी दिले. राज्य शासनामार्फत कारखान्यांना ४ हजार ३५५ कोटी रुपयांचे कर्ज दिले. या कर्जाच्या वापराचे निरीक्षण करण्यासाठी राष्ट्रीय सहकार विकास निगमच्या (एनसीडीसी) अधिकाऱ्यांनी जून-जुलैमध्ये ३० सहकारी साखर कारखान्यांना क्षेत्रीय भेटी दिल्या आहेत.

त्यापैकी २१ सहकारी साखर कारखान्यांकडून कर्जाच्या वापरात गंभीर स्वरूपाचे उल्लंघन आढळले. तर ३ साखर कारखान्यांनी कर्जाच्या वापरात काही प्रमाणात उल्लंघन केल्याचे व उर्वरित ६ साखर कारखान्यांनी कर्जाच्या अटी शतीर्नुसार कर्ज रक्कमेचा विनियोग केल्याचे आढळले आहे.

### समिती करणार शासनास शिफारस

या समितीत संबंधित प्रादेशिक सहसंचालक (साखर) हे सदस्य तर साखर आयुक्तालयातील संचालक (अर्थ) या समितीचे सदस्य सचिव असणार आहेत. एनसीडीसीच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणीमध्ये त्यांना कर्जाच्या विनियोगात गैरवापर केल्याचे आढळून आलेल्या साखर कारखान्यांविरुद्ध करावयाच्या कारवाईची शासनास शिफारस ही समिती करणार आहे. या समितीला अहवाल देण्यासाठी दोन आठवड्यांची मुदत दिली आहे.

# कै.आप्पासाहेब वारद यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने कै.पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्त इंद्रभवन आवारातील कै.पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद यांच्या पुतळ्यास व कौन्सिल हॉल त्यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



याप्रसंगी कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे,नितीन गायकवाड, मलेश आप्पा कावळे. मल्लिनाथ पाटील, महेंद्र वारद, शशिरेखा लूपने,उमेश सिंदगी, नरेंद्र गांभीरे, राजेंद्र मायनाल, अण्णासाहेब कोथळी, श्वेता कोठावळे, चंद्रभागा भाजीभाकरे आदि उपस्थित होते.

## जाहीर प्रसिध्दीकरण

अर्ज नं/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

सुप्रिया शिवाजी चव्हाण
रा. येवती ता.मोहोळ जि.सोलापूर } **अर्जदार**

**विरूद्ध**

ग्रापंचायत आष्टी ता. मोहोळ } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार सुप्रिया शिवाजी चव्हाण जन्म दि.२६/५/१९९९ रोजी आष्टी ता.मोहोळ.जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्या कडे सुप्रिया शिवाजी चव्हाण यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे मे १९९९ चे आभिलेखात अर्जदार याची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.४/२/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता. १९/१/२०२६

**हुकूमावरुन**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि. अर्ज नं.२० / २०२५

**मोहोळ येथील मे. सिव्हील जज्ञ ज्युनिअर डिव्हीजन साो, यांचे कोर्टात**

१) श्री. नागनाथ दत्तु डोंगरे वय - ७५ वर्षे, धंदा - शेती, रा. वडाचीवाडी, पो. हिवरे, ता. मोहोळ, जि. सोलापूर
२)सौ. बाई नागनाथ डोंगरे वय - ६५ वर्षे, धंदा- घरकाम, रा. वडाचीवाडी, पो. हिवरे, ता. मोहोळ, जि. सोलापूर
३) श्रीमती शैला रेवण डोंगरे वय - ४५ वर्षे, धंदा- घरकाम, रा. वडाचीवाडी, पो. हिवरे, ता. मोहोळ, जि. सोलापूर
४) रोहित रेवण डोंगरे वय- २५ वर्षे, धंदा- शेती, रा. वडाचीवाडी, पो. हिवरे, ता. मोहोळ, जि. सोलापूर अर्जदार
५) ऋतुजा रेवण डोंगरे वय - २३ वर्षे, धंदा- घरकाम, रा. वडाचीवाडी, पो. हिवरे, ता. मोहोळ, जि. सोलापूर } **अर्जदार**

**विरूद्ध**

**कोणी नाही** } **सामनेवाला**

अर्जदारांने प्रस्तुतचा अर्ज मयताचे वारसप्रमाणपत्र मिळणेकामी या मे. कोर्टात दाखल केलेला आहे. अर्जदार नं. १ व २ हे मयताचे आई व वडील आहे अर्जदार नं. ३ चे पती व अर्जदार नं. ४ व ५ चे वडिल म्हणजेच रेवन नागनाथ डोंगरे हे दि.३१/०१/२०२५ रोजी मौजे श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर येथे मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्या व्यतिरिक्त मयतांना कायदेशीर दुसरे कोणीही वारस नाहीत. त्याअर्थी तमाम लोकांस सदर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, मयत रेवन नागनाथ डोंगरे यांचे बँक ऑफ इंडिया शाखा- मोहोळ येथे ०७१९१८२१०००३६०८ हे खाते होते व आहे. सदर खात्यास अपघाती विमा (Accidental death Insurance cover Available) चालु होता. त्यामुळे सदर मयत रेवन नागनाथ डोंगरे यांचे मृत्युपश्चात सदर खात्यावर असलेला अपघाती विमा मिळणेसाठी संबंधीत बँकेत अर्जदार यांनी तोंडी दि.२६/०५/२०२५ रोजी विचारणा केली असता त्यांनी मे. कोर्टातुन वारस दाखला आणणेबाबत अर्जदार यांना तोंडी सांगीतल. त्यामुळे अर्जदारास सदरचा अर्ज दाखल करणे क्रम पात्र व तसे जाहिर होवुन मिळणेसाठी अर्जदार यांचे नांवे वारस प्रमाणपत्र देणेबाबत कोणाचीही काहीही तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी त्यांची तक्रार व हरकत या न्यायालयात नेमलेली ता. १२/२/२०२६ रोजी अथवा सदरचे प्रसिध्दीकरण झालेपासुन ०१ महिन्याचे आत दाखल करावी. अन्यथा पुढील योग्य ती चौकशी करुन अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र देणेबाबत योग्य तो आदेश केला जाईल याची नोंद घ्यावी. हे जाहिर प्रसिध्दीकरण दिले असे. ता.१६/१/२०२६

**क. लिपिक** (शिक्का) **सहा. अधिक्षक दिवाणी/फौजदारी न्यायालय मोहोळ**

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15 **सर्टीफाईड कंपनी**

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

**-: संपर्क :-**

**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# जिल्हा रुग्णालयात महिलांसाठी रजोनिवृत्ती क्लिनिक सुरू

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील महिलांचे आरोग्य सुदृढ राखणे, तसेच विशेषत: रजोनिवृत्ती कालावधीमध्ये महिलांमध्ये होणाऱ्या शारीरिक, मानसिक व संप्रेरक बदलांवर योग्यवेळी वैद्यकीय उपचार, तपासणी व समुपदेशन उपलब्ध देण्याकरिता मकरसंक्रांतीचे औचित्य साधून राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य सेवा विभागाच्या निर्देशनानुसार सोलापूर जिल्ह्यातील सर्व उपजिल्हा रुग्णालय, महिला रुग्णालय तसेच जिल्हा रुग्णालयांमध्ये व ग्रामीण रुग्णालय येथे रजोनिवृत्ती क्लिनिक सुरू करण्यात आले असल्याचीमाहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे यांनी सांगितली.



साधारण ४५ ते ५५ या वयात महिलांचे मासिक पाळी कायमची बंद होते, यालाच मेनोपॉज अथवा रजोनिवृत्ती म्हणतात. पण, या काळात शरीरात अनेक बदल होतात व त्या बदलांना सक्षमपणे सामोरे जाणे गरजेचे असते.

त्या अनुषंगाने दर बुधवारी विशेष मेनोपॉज ओपीडी सुरू करण्यात आली असून त्याचा फायदा जिल्ह्यातील रजोनिवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या महिलांना होणार आहे.या सुविधा मिळणारमेनोपॉज दरम्यान गरम झटके, घाम येणे, झोप न लागणे, मूड बदल, चिडचिड, नैराश्य, वजन वाढ, सांधेदुखी आदी आजार होऊ शकतात. क्लिनिकमध्ये स्त्रीरोग तज्ज्ञ व इतर तज्ज्ञ डॉक्टर या समस्या समजून घेऊन योग्य उपचार देतात. हाडांची झीज टाळता येते.

इस्ट्रोजेन हार्मोन कमी झाल्यामुळे हाडे ठिसूळ होतात. फॅक्चरचा धोका वाढतो. कॅल्शियम, व्हिटॅमिन डी, आदी तपासण्या, योग्य व्यायाम सल्ला मिळतो. हृदयविकार व मधुमेहाचा धोका कमी करता येतो. बीपी, शुगर, कोलेस्टेरॉल वाढण्याचा धोका असतो. नियमित तपासणी, उपचार व आहार जीवनशैली मार्गदर्शन मिळते.


**CHANGE IN NAME**

I am changing my name from SURYAKANT MANIK SHETE to **SURYAKANT MANIKRAO SHETE** for passport issuance.

**CHANGE IN NAME**

I am changing my name from Padmashree Sryakant Shete to **PADMASHRI SRYAKANT SHETE** for passport issuance.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) महाराष्ट्राचे राष्ट्रवादीतून पुढे आलेले एक नेते
२) एक हिंदी सिनेनिर्माते-** चोप्रा ३) डाळ अथवा भात शिजवण्यासाठी याचा वापर करतात ४) आडातून पाणी खेचण्याचे चक्राकार साधन
५) सलमान खानचा थोरला भाऊ
६) भारतीय क्रिकेट टीममधील ऐंशीच्या दशकातील अष्टपैलू खेळाडू ११) दात
१३) मोठी पेटी
१६) पाठवणे, **** करणे
२०) सूट, मोकळीक
२२) महादेवाचे एक नाव २४) महाराष्ट्रातील एक जिल्हा
२७) शरीर, काया
२८) कार उलट लिहा
२९) चांगला रूचकर स्वयंपाक बनविणारी स्त्री
३०) कपडे धुण्याचा एक साबण
३२) समुद्र ३३) बंदूक (इंग्रजीत)
३४) चरण ३६) हळू, मंद गतीने
३७) शुभकार्यासाठी उभारलेला छत
३९) सातत्याने, नेहमी
४१) पक्ष्याचे पंख, परंतु (हिंदीत)
४२) ईश्वर (हिंदीत),४६) श्रीविष्णू पत्नी
४७) गंध, परिमळ

**आडवे शब्द :** १) हेराफेरी चित्रपटातील एक प्रमुख अभिनेता
५) अभिनेता असलेला अमिताभ बच्चन यांच्या मुलाचे नाव ७) संशय ८) एक म्हण-*** तो वजीर ९) एक म्हण-बळी तो कान ** १०) जरचा साथीदार १२) घोडेसवारी, फेरफटका १४) ख्रिश्चन बांधवाचा पवित्र धर्मग्रंथ १५) एखाद्या कामासाठी स्वत:जवळचे पैसे खर्च करणे-***मोड करणे १७) एक हिंदी न्यूज चॅनल-** तक १८) उणीव, टंचाई १९) धान्याचा ढीग २१) स्पेशल, विशेष २३) उमर (मराठीत) २५) महिलांचा नाकात घालण्याचा एक दागिना २६) वतनाचा मालक २९) शेतातील कामाचा हंगाम ३०) खलनायक (इंग्रजीत) ३१) तक्रार, फिर्याद (हिंदीत) ३१) फर्निचरसाठी या झाडाचे लाकूड वापरतात
३३) चूक, चुकीचे (हिंदीत) ३४) ब्रेड (मराठीत)
३५) मान (हिंदीत) ३६) दुधावरील मलई ३७) आठवड्यातील एक दिवस-***वार, एक उपग्रह ३८) वाळूचे मैदान ३९) प्रॅक्टीस (मराठीत) ४०) कडूच्या विरूध्दार्थी शब्द ४१) माघारी देणे, माघारी करणे-*** देणे ४३) श्रवणेंद्रिय
४५) कालच्या अगोदरचा दिवस ४८) लिंबू पाण्याचे पेय
४९) भारताचे माजी कृषिमंत्री-*** पवार
५०) महिना

## सुडोकु - 156

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 3 | | 5 | | | | | 6 |
| | | 8 | | 2 | | | 1 | 9 |
| | 1 | 7 | | | | 4 | 5 | |
| 8 | 6 | | 2 | | | | 7 | |
| | 7 | 4 | 8 | | | 2 | 6 | |
| 1 | | 9 | | | 7 | 8 | 3 | |
| 2 | | | 1 | 7 | 8 | | 4 | 3 |
| | | 1 | 9 | 4 | | | | 7 |
| | | | 6 | 5 | | | | |

# आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस कार्यकर्त्यांचा भाजप प्रवेश



**हंजगी (कटूसत्य वृत्त) :-** सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत शिक्षण, आरोग्य व पायाभूत सुविधांच्या माध्यमातून वागदरी जिल्हा परिषद गटाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी भारतीय जनता पक्ष कटिबद्ध असल्याचे आश्वासन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिले.

वागदरी जिल्हा परिषद गटात काँग्रेस पक्षाला मोठे खिंडार पडले असून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी ते बोलत होते.

या वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे, अप्पू बिराजदार यांच्यासह वागदरी गटातील विविध नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच वागदरीचे माजी सरपंच रवी किरण वरनाळे, डॉ. शरण वरनाळे, माजी सरपंच श्रीकांत भैरामडगी, शिवराज मंत्री पोमाजी आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

अल्पसंख्यांक समाजातील नेते इस्त्राईल नदाफ, माजी सरपंच व जिल्हा परिषद सदस्य विजय ढोपरे, शंकर घुगरे, विकास नंजुडे, सिद्धारूढ धड्डे, श्रीशैल पोमाजी, सुभाष शिरगण आदींनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली आहे.

अक्कलकोट तालुक्यातील राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा वागदरी जिल्हा परिषद गट काँग्रेससाठी हादरवून टाकणारा ठरला आहे. यापूर्वी अक्कलकोटचे माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे यांनी काँग्रेसची साथ सोडत धनुष्यबाण हाती घेतल्याने काँग्रेसला मोठा धक्का बसला होता. आता पुन्हा एकदा वागदरी गटातील काँग्रेसचा गड पूर्णतः ढासळल्याने काँग्रेसमध्ये अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

या घडामोडींमुळे वागदरी गटात भाजपाची ताकद लक्षणीयरीत्या वाढल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

# महापौर, उपमहापौर व विरोधी पक्ष कार्यालय सज्ज

## आयुक्त डॉ. ओम्बासे यांची कॉन्सील हॉल व कार्यालयांची पाहणी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया नुकतीच यशस्वीरीत्या पार पडली असून नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांसाठी महापौर, उपमहापौर तसेच विरोधी पक्ष नेते व विविध समित्यांच्या कार्यालयांचे नूतनीकरण व सज्जतेचे काम अंतिम टप्यात असून वेळेत काम पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.या अनुषंगाने महानगरपालिकेच्या मुख्यालयातील कॉन्सील हॉल, महापौर व उपमहापौर कार्यालय, विरोधी पक्ष कार्यालय तसेच विविध समित्यांच्या कार्यालयांमध्ये सुरू असलेल्या नूतनीकरणाच्या कामांची आज मा. आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी कामाच्या दजार्बाबत, वेळेत पूर्णत्व, स्वच्छता, प्रकाश व्यवस्था, बैठक व्यवस्था, माहिती तंत्रज्ञान सुविधा तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या बाबींची तपासणी केली.पाहणीदरम्यान मा. आयुक्तांनी संबंधित विभागप्रमुख व अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देत सांगितले की, सर्व कार्यालये नागरिकाभिमुख, प्रशासकीय कामकाजास अनुकूल व आधुनिक सुविधांनी सुसज्ज असावीत. कॉन्सील हॉलमध्ये सभासदांसाठी योग्य आसन व्यवस्था, ध्वनी व दृकश्राव्य (ऑडिओ-व्हिज्युअल) प्रणाली, वातानुकूलन, स्वच्छता व सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात यावा, अशा सूचना त्यांनी दिल्या.तसेच नूतनीकरणाचे काम गुणवत्तापूर्ण व ठरलेल्या कालमयार्देत पूर्ण करून पदग्रहण व आगामी सभांसाठी सर्व कार्यालये सज्ज ठेवावीत, असे निर्देशही मा. आयुक्तांनी दिले. नागरिक व लोकप्रतिनिधींना एकाच ठिकाणी समन्वयाने काम करता यावे, यासाठी कार्यालयीन मांडणी सुयोग्य पद्धतीने करण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.या पाहणीमुळे महानगरपालिकेतील प्रशासकीय व लोकप्रतिनिधींचे कामकाज अधिक सुसूत्र, पारदर्शक व कार्यक्षम होण्यास मदत होणार असून, लवकरच महापौर, उपमहापौर, विरोधी पक्ष नेते व विविध समित्यांची कार्यालये पूर्णपणे सज्ज होणार आहेत.

यावेळी नगरसचिव प्रवीण दंतकाळे, नगराअभियंता सारिका अक्कलुवार, कार्यकारी अभियंता विद्युत राजेश परदेशी, अंतर्गत लेखा परीक्षक राहुल कुलकर्णी, सहअभियंता विद्युत महादेव इंगळे, नितीन गायकवाड आदी मान्यवर उपस्थिती होते.

# सोलापूरात प्रवासी वाहतुकीतून मध्य रेल्वेला ७२३.२७ कोटींचे उत्पन्न



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मध्य रेल्वेने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये (डिसेंबर २०२५ पर्यंत) प्रवासी वाहतूक आणि प्रवासी भाड्यातून मिळणाऱ्या उत्पन्नात उल्लेखनीय वाढ नोंदवली आहे.

वाढत्या प्रवासी संख्येला सामावून घेत सुरक्षित, किफायतशीर व विश्वासार्ह सेवा देण्याच्या दिशेने मध्य रेल्वेची कामगिरी महत्त्वाची ठरत आहे.

मध्य रेल्वेने या आर्थिक वर्षात (डिसेंबर २०२५ पर्यंत) प्रवासी भाड्यातून एकूण ५,८८१.०८ कोटीकार्यक्षम प्रवास सुविधा देण्यासाठी कटिबद्धडिसेंबर २०२५ मध्ये प्रवासी भाड्यातून मिळालेले एकूण उत्पन्न ७२३.२७कोटी रुपये इतके असून, यामध्ये उपनगरीय सेवांमधून ८७.५८ कोटी रुपये व उपनगरी सेवांव्यतिरिक्त सेवांमधून ६३५.६९ कोटी रुपये उत्पन्न मिळाले आहे.

गेल्या वर्षीच्या याच महिन्यात हे उत्पन्न ६०४.४० कोटी रुपये होते. यामध्ये सुमारे २० टक्क्यांची लक्षणीय वाढ झाली आहे. मध्य रेल्वे सर्व प्रवाशांना सुरक्षित, किफायतशीर, विश्वासार्ह आणि कार्यक्षम प्रवास सुविधा देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे. मागील वर्षीच्या याच कालावधीत हे उत्पन्न ५,५७०.३३ कोटी रुपये होते. यामध्ये ५ टक्क्यांहून अधिक वाढ नोंदवली गेली आहे. उपनगरीय सेवांमधून या आर्थिक वर्षात (डिसेंबर २०२५ पर्यंत) ७५७.१२ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले असून, गेल्या वर्षी याच कालावधीत हे उत्पन्न ७२१.७० कोटी रुपये होते.

यामध्ये सुमारे ५ टक्क्यांची वाढ झाली आहे. तसेच, उपनगरी सेवांव्यतिरिक्त (हेमू, मेमू मेल व एक्प्रेस) प्रवासी वाहतुकीतून ५,१२३.९६ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले असून, गेल्या वर्षी हे उत्पन्न ४,८४८.६३ कोटी रुपये होते. या उत्पन्नातही ५ टक्क्यांहून अधिक वाढ नोंदवण्यात आली आहे. प्रवासी संख्येच्या कबाबतीतही मध्य रेल्वेने उल्लेखनीय वाढ साध्य केली आहे. या आर्थिक वर्षात (डिसेंबर २०२५ पर्यंत) एकूण १,२२७दशलक्ष प्रवाशांची वाहतूक करण्यात आली असून, गेल्या वर्षी ही संख्या १,२०२ दशलक्ष होती.

यामध्ये २ टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. यामध्ये १,०७३ दशलक्ष उपनगरीय प्रवासी असून, मागील वर्षी ही संख्या १,०५८ दशलक्ष होती. उपनगरी सेवांव्यतिरिक्त (डेमू/मेमू/मेल/एक्सप्रेस) प्रवाशांची संख्या यावर्षी १५४ दशलक्ष असून, गेल्या वर्षी ती १४४ दशलक्ष होती. विशेष म्हणजे, डिसेंबर २०२५ या एकाच महिन्यात मध्य रेल्वेने १४२ दशलक्ष प्रवाशांची वाहतूक केली. यामध्ये १२४ दशलक्ष उपनगरीय व १८ दशलक्ष उपनगरी सेवांव्यतिरिक्त प्रवासी समाविष्ट होते. मागील वर्षी डिसेंबर महिन्यात ही संख्या १३८ दशलक्ष होती, ज्यामध्ये ३ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे.

# संग्रामनगर शाळेच्या कला तरंग स्नेहसंमेलनात बालकलाकारांनी चढविला रंग



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** श्री जयसिंह मोहिते पाटील विद्यालय संग्रामनगर ता. माळशिरसच्या "कला- तरंग" या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उदघाट्न अकलूज नगरपरिषदचे नुतन नगरसेवक सयाजीराजे संग्रामसिंह मोहिते पाटील यांच्या शुभहस्ते स्मृतिमंदिर अकलूज येथे संपन्न झाले.

यावेळी शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे संचालक सुभाष दळवी, प्रशाला समिती सभापती निशा गिरमे, सदस्य महादेव अंधारे, यशवंत साळुंखे, उज्वलाताई अडाणे, विस्ताराधिकारी नाचणे मॅडम, उपसरपंच सुदेश रासकर, मुख्याध्यापक मल्हारी घुले, प्राथमिक विभाग मुख्याध्यापक गणेश करडे आदी उपस्थित होते.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील व रत्नप्रभादेवी मोहिते पाटील यांच्या प्रतिमापूजन आणि दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर प्रशालेतील विद्यार्थी विनायक इंगळे- बालक्रीडा स्पर्धा, हिंदवी देवशेटे-वक्तृत्व स्पर्धा, सोनाक्षी माने- नॅशनल तायक्वादो स्पर्धा, ईशा साठे- विभागीय क्रीडास्पर्धा, अद्विक बनपटटे- राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा, संयोगिता माने इंग्रजी वक्तृत्व, पिकेएम समूहनृत्य स्पर्धा, संग्रामसिंह मोहिते पाटील मित्र मंडळ राज्यस्तरीय लेझीम स्पर्धा मुली प्रथम,मुले द्वितीय क्रमांक अशा गुणवंत विद्यार्थी, पालक व मार्गदर्शक शिक्षक यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार संपन्न झाला.

सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक विभागांतील विद्यार्थ्यांनी विविध १८ गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक मल्हारी घुले यांनी केले तर सुत्रसंचलन गणेश करडे, आरती दोरकर, विश्वनाथ हलकुडे या शिक्षकांनी तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे निवेदन संयोगिता माने, अद्विक बनपट्टे, सिद्धेश्वर स्वामी, आनम शेख, श्रेया ढोबळे या विद्यार्थ्यांनी केले. आभार सुभाष चव्हाण यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कविता कुलकर्णी, राणी गोरे, वैभवी बोदडे, शुभांगी कदम, शाहीनबानू काझी, रोहिणी गायकवाड, सहशिक्षक सुरेश माने, संतोष कदम, महेश शिंदे, रविंद्र कवटे, सतिश एकतपुरे, गणेश म्हसवडे,अशोक व्यवहारे, सुनील काळे या शिक्षकांसह विद्यार्थी-पालक यांनीही कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# निमगावात महापुरुषांना 'रक्तदानातून अभिवादन

## ११४ जणांनी केले रक्तदान, महिलांची उपस्थिती लक्षणीय



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** राजमाता जिजाऊ माँसाहेब आणि हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त निमगाव येथे सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले. राजे प्रतिष्ठान आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात 114 रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला. विशेष म्हणजे, या शिबिरात महिलांचा सहभाग लक्षणीय राहिल्याने या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सोलापूर येथील मल्लिकार्जुन ब्लड बँक यांच्या सहकार्याने हे शिबिर पार पडले. रक्तदान करण्यापूर्वी वैद्यकीय पथकाद्वारे प्रत्येक दात्याची प्राथमिक आरोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये रक्तदाब, वजन आणि हिमोग्लोबिनची तपासणी करून पात्र दात्यांचे रक्तदान घेण्यात आले. सुरक्षिततेचे सर्व नियम पाळून हे संकलन करण्यात आले.

राजमाता जिजाऊंच्या जयंतीचे औचित्य असल्याने गावातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला सहभाग नोंदवला. केवळ पुरुषच नव्हे, तर महिलांनीही रक्तदानात हिरीरीने पुढाकार घेतल्याने शिबिराची उंची अधिक वाढली. प्रत्येक रक्तदात्याला आयोजकांच्या वतीने प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन अकलूज येथील प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. एम. के. इनामदार यांच्या हस्ते झाले. यावेळी उद्योजक शरद मोरे, संतोष राऊत, लक्ष्मण डोईफोडे, महादेव बंडगर,नागनाथ मगर, गोरख पवार, रज्जाक मुलाणी, जाफर शेख, माऊली गाडे, ॲड लक्ष्मण मगर, भाऊसाहेब मगर, सचिन कदम यांसह गावातील मान्यवर उपस्थित होते. "तरुणांसोबतच महिलांनीही अशा सामाजिक उपक्रमात पुढे येणे ही अभिमानास्पद बाब आहे," असे गौरवोद्गार मान्यवरांनी काढले.हे शिबिर यशस्वी करण्यासाठी राजे प्रतिष्ठान व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# विज्ञान शिक्षणाला चालना; ग्रामीण भागात प्रयोगशाळेचा लोकार्पण सोहळा



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि शैक्षणिक संपन्नता वाढवण्यासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन मोहोळ नागरी सहकारी पतपुरवठा संस्थेचे चेअरमन डॉ. कौशिक गायकवाड यांनी केले. तांबोळे सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाबाबत असलेली आवड लक्षात घेता त्यांना अद्ययावत सुविधा देणे अत्यावश्यक होते. त्या दृष्टीने उभारण्यात आलेली अत्याधुनिक विज्ञान प्रयोगशाळा निश्चितच प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

तांबोळे (ता. मोहोळ) येथील कर्मवीर रामदास भाऊ कोकाटे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शाळेत अलाईव्हज लाईफ सायन्सेस या संस्थेच्या सीएसआर फंडातून व उर्मी फाऊंडेशन, पुणे यांच्या समन्वयातून लाखो रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक विज्ञान प्रयोगशाळेच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते.

या कार्यक्रमास अलाईव्ह लाईफ सायन्सेसचे उपव्यवस्थापक बेलदार, देशभक्त संभाजीराव गरड शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव शैलेश गरड, भीमा कारखान्याचे संचालक संभाजी कोकाटे, समर्थ भवानी महाराज शिक्षण संस्थेचे चेअरमन वैभव गुंड, उर्मी फाऊंडेशनचे मोहोळ समन्वयक प्रज्वल पाटील, अमोल सोंडगे, अशोक कांबळे, कर्मवीर रामदास कोकाटे शिक्षण मंडळाचे सचिव विजय कोकाटे, अण्णासाहेब नागणे, मुख्याध्यापक पी. के. जाधव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीबद्दल समाधान व्यक्त करत अलाईव्ह लाईफ सायन्सेस व उर्मी फाऊंडेशन यांच्या या आदर्शवत उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विजय कोकाटे यांनी केले. सूत्रसंचालन दत्तात्रय तळेकर यांनी केले तर आभार बलभीम हांडे यांनी मानले.







